# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org
roaurangabad.dte@gmail.com

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०११/ ८९१२
दिनांक : 19 NOV 2011

प्रति,
प्राचार्य,
शासकीय,शासकीय अनुदानित,विनाअनुदानित
अभियांत्रिकी,तंत्रशास्त्र,वास्तुशास्त्र,
औषधनिर्माणशास्त्र,पदवी,पदविका,अभ्यासक्रम संस्था
**औरंगाबाद विभाग.**

विषय :- रॅगिंग प्रकरणांबाबत उपाययोजना करण्याबाबत.
संदर्भ :- १.महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रं.जेबीव्हीसी २०११/प्र.क्र.२६६/विशि-३ उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय,मुंबई दि.१४ ऑक्टोंबर,२०११

शासन पत्र क्र संकिर्ण १०९८(११३/९८)विशि-३ दि.२७/५/१९९९ अन्वये रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९ दि.१ जुन १९९९ पासुन अंमलात आलेला आहे.सदर अधिनियमाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की,रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९ च्या ठळक प्रती संस्थेच्या आवारात तसेच क्लासमध्ये,कॅंटीन आणि वसतीगृह या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल,अशा पध्दतीने लावण्यात याव्यात तसेच प्रथम वर्ष विद्यार्थ्यांची व वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांची वेगवेगळी बैठक आयोजित करून त्यांना अधिनियमासंबंधीच्या सुचना देण्यात याव्यात.रॅगिंग प्रकरणे संस्थेत घडणार नाहीत,या बाबत दक्षता घेण्यात यावी. असे प्रकार घडल्यास संबंधित प्राचार्यांना जबाबदार धरण्यात येईल,रॅगिंग होऊ नये म्हणुन सोबत जोडलेल्या संदर्भीय शासन परिपत्रकातील सुचनानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद.

प्रत :- प्रोग्रमार यांना माहितीस्तव.सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**महाराष्ट्र शासन**

क्र. जेबीव्हीसी २०११/प्र.क्र.२६६ /विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०११.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,

विषय:- शैक्षणिक संस्थांमधील रॅगींग प्रकरणांबाबत उपाययोजना करण्याबाबत.

संदर्भ :-शासन पत्र क्र रेविऊ २००९/ प्र. क्र. २५५/ विशि-३ दिनांक ३०.६.२०१०

महोदय,

राज्यातील शैक्षणिक संस्थामध्ये रॅगींगची प्रकरणे उद्‌भवतात. मा. सर्वोच्च न्यायालयाने डॉ. राघवन समिती नेमून याबाबत शिफारस करण्यासाठी आदेशीत केले होते. त्यानुसार डॉ. राघवन समितीने आपल्या शिफारशी मा. सर्वोच्च न्यायालयास सादर केल्या आहेत. सदर शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार प्रत्येक जिल्हयात जिल्हाधिकारी/ उपआयुक्त यांच्या अध्यक्षते खाली जिल्हा स्तरीय समिती स्थापन करण्यात यावी अशी विनंती संदर्भाधिन येथील पत्रान्वये करण्यात आली आहे.

२. राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंची संयुक्त बैठक दिनांक १६.८.२०११ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीतही रॅगींग प्रकराबाबत चर्चा होऊन खालील उपाययोजना सूचविण्यात आल्या आहेत.

(i) The Higher and Technical Education Department should get Perioidical reports from the District level Committees appointed by the Government for the purpose.

३. यास्तव आपणास विनंती करण्यात येते की, कुलगुरुंच्या दिनांक १६.८.२०११ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीत निर्णय घेण्यात आल्याप्रमाणे परिच्छेद २ मधील अ.क्र. (i) बाबत आपल्या जिल्हयात



स... ,
वि.
आवक ९२६५९
दिनांक 01 NOV 2011

शैक्षणिक संस्थांमध्ये ( विद्यापीठांसह ) घडलेल्या रॅगींग प्रकरणांचा प्रत्येक त्रैमासिक अहवाल या विभागास पाठविण्याची कार्यवाही करावी.

आपला विश्वासू,

( प्र. गि. कानडे )
कक्ष अधिकारी

प्रत,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण,
यांना माहितीस्तव व आवश्यकत्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.

**महाराष्ट्र शासन**

क्र. जेबीव्हीसी २०११/प्र.क्र.२६६ /विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- १४ ऑक्टोबर, २०११.

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,

विषय:- शैक्षणिक संस्थांमधील रॅगींग प्रकरणांबाबत उपाययोजना करण्याबाबत.

महोदय,

राज्यातील शैक्षणिक संस्थामध्ये रॅगींगची प्रकरणे उद्भवतात. जी मुले महाविद्यालयात प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतात त्यांच्याबाबतीत जास्तीत जास्त असे प्रकार घडतात. रॅगींग सारखा निंदनीय प्रकार घडल्यामुळे विद्यार्थ्यांवर मानसिक परिणाम होऊन विद्यार्थी त्यांचे मानसिक स्वास्थ घालवून बसतात. ब-याच प्रकरणा मध्ये रॅगींगची प्रकरणे दडपण्याचा प्रकार होतो. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांवर रॅगींग प्रकार होतो तो विद्यार्थी मानसिक दृष्ट्या अधिकच खचतो. वास्तविकत: शैक्षणिक संस्थांमध्ये निकोप वातावरण असणे आवश्यक असते. शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगींग प्रकार होऊ नये म्हणून मा. सर्वोच्च न्यायालयाने डॉ. राघवन समिती नेमून याबाबत शिफारस करण्यासाठी आदेशीत केले होते. डॉ. राघवन समितीने आपल्या शिफारशी मा. सर्वोच्च न्यायालयास सादर केल्या आहेत. सदर शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे आदेश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिले आहे. त्यानुसार विद्यापीठांनी कार्यवाही करण्याबाबत यापूर्वीच शासनाकडून सूचना देण्यात आल्या आहेत.

२. राज्यातील कुलगुरुंची संयुक्त बैठक दिनांक १६.८.२०११ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीतही रॅगींग प्रकराबाबत चर्चा होऊन खालील उपाययोजना सूचविण्यात आल्या आहेत.

(i) The Universities are required to set up certain Committees up-to grassroot level, conducting their meetings and sensitizing the partents.



सह..., ...,
वि...
आवक ९२६८०
दिनांक 01 NOV 2011

(ii) The Vice Chancellors of the Universities should send a compliance report every year to the Chancellor's office regarding the measures taken by the Universities with regard to recommendations of the Raghvan Committee.

(iii) **The Vice Chancellor to continue** sending the compliance report once in a year and give wide publicity to all recommendations of the Committee once the admission process is started in the Universities and Colleges.

३. यास्तव आपणास विनंती करण्यात येते की, कुलगुरुंच्या दिनांक १६.८.२०११ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीत निर्णय घेण्यात आल्याप्रमाणे परिच्छेद २ मधील अ.क्र.(i), (ii), (iii) बाबत विद्यापीठांनी कार्यवाही करावी.

आपला

( प्र. गि. कानडे )
कक्ष अधिकारी

प्रत,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण,
यांना माहितीस्तव व आवश्यकत्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.